“भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार” योजनेसाठी अतिरिक्त निधी जिल्हा परिषद, पालघरच्या धर्तीवर जिल्हा परिषदेच्या निधीतून उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः आविवि-२०१६/प्र.क्र.९६/कार्यासन-८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २० डिसेंबर, २०१७

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांक: आविवि-२०१५/प्र.क्र.७८/का-१६, दि.१८ नोव्हेंबर,२०१५.

२) शासन निर्णय क्रमांक : आविवि-२०१६/प्र.क्र.६६/का-८, दिनांक ०२ ऑगस्ट, २०१६

३) मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या गाभा समितीमध्ये घेण्यात आलेला निर्णय.

प्रस्तावना -

अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार देण्यासाठी “भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना” ही शासनाने सुरू केलेली अत्यंत महत्वाची पथदर्शी योजना आहे. ही योजना संदर्भाधीन दि.१८ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये दि.१ डिसेंबर, २०१५ पासून सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत स्त्री गरोदर असल्याचे निश्चित झाल्यापासून बाळंतपणापर्यंत तसेच स्तनदा मातांना पहिले सहा महिने एक वेळ आहार देण्याचा निर्णय दि.२ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

“भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना” अधिक परिणामकारकरित्या राबविता यावी यासाठी पालघर जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने एक वेळ आहाराच्या खर्चासाठी देण्यात येणाऱ्या प्रति लाभार्थी रू.२५/- व्यतिरिक्त रू.१०/- इतका निधी जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याशिवाय मेळघाटमध्ये अंगणवाडी मार्फत ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) ५ % पेसा अबंध निधीतून सुरू करण्याचा उपक्रम राबविला आहे.

मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या गाभा समितीच्या बैठकीमध्ये “भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार” अधिक परिणामकारकरित्या राबविता यावी यासाठी जिल्हा परिषद, पालघर यांनी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे आदिवासी क्षेत्रातील अन्य जिल्हा परिषदांनी अतिरिक्त

निधी स्वनिधीतून उपलब्ध करून देण्यासाठी निर्णय घेण्याबाबत कळविण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन परिपत्रक:-

अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार देण्यासाठी सुरु असलेली "भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना" अधिक परिणामकारकरित्या राबविता यावी यासाठी जिल्हा परिषद, पालघर यांनी स्वनिधीतून रू.१०/- इतका अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिलेला आहे. राज्यातील इतर जिल्हा परिषदांनी देखिल त्यांच्या स्वनिधीतून "भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार" योजनेसाठी अंगणवाड्याअंतर्गत आहार समितीस अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याबाबत योग्य निर्णय घ्यावा.

सदर शासन परिपत्रक ग्राम विकास विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३७०/वित्त-३, दिनांक ७.१२.२०१७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१७१२२०१५२५१४९५२४** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Laxmikant Gopalrao Dhoke

Digitally signed by Laxmikant Gopalrao Dhoke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=413beeca50b65438c7a037917ccf1f24d8ca684b65640df6372ea731ffac4dfc, cn=Laxmikant Gopalrao Dhoke
Date: 2017.12.20 16:56:26 +05'30'

(ल. गो. ढोके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४) मा.मंत्री (महिला व बाल विकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
५) मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
६) मा.मंत्री (अन्न व नागरी पुरवठा) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
७) मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
८) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.

९) सर्व मा. संसद सदस्य.
१०)सर्व मा. विधानसभा /विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ.
११)मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१२)अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३)अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४)अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५)प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६)प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७)सचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई.
१८)सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९)सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग,मंत्रालय, मुंबई
२०)आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
२१)आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था , पुणे.
२२)व्यवस्थापकीय संचालक , महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ, नाशिक .
२३)महासंचालक, राजमाता जिजाऊ पोषण मिशन, नवी मुबंई.
२४)आयुक्त, कुटुंब कल्याण,मंत्रालय, मुंबई.
२५)आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
२६)संचालक, सार्वजनिक आरोग्य संचालनालय,मुंबई.
२७)सर्व विभागीय आयुक्त.
२८)सर्व जिल्हाधिकारी.
२९)युनिसेफ राज्यप्रमुख, मुंबई.
३०)स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी.
३१)मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (अनुसूचित क्षेत्र/सर्व आदिवासी जिल्हे).
३२)सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास.
३३)सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
३४)प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास प्रकल्प (१६ जिल्हे).
३५)सह संचालक, माहिती व प्रसिध्दी संचालनालय, मुंबई.
३६)सह संचालक, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३७)सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद.
३८)उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बाल कल्याण, जिल्हा परिषद.

३९) जिल्हा कोषागार अधिकारी (संबंधित जिल्हे).
४०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
४१) महालेखापाल (लेखापरिक्षा), मुंबई / नागपूर.
४२) वित्त विभाग (व्यय -१४), मंत्रालय, मुंबई -३२.
४३) सर्व सहसचिव /उपसचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
४४) निवड नस्ती -कार्यासन (८)